भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील प्रकरण दोन (सामाजिक आघात निर्धारण) व तीन (अन्न सुरक्षा विषयक तरतूदी) च्या तरतूदी लागू करण्यापासून सूट देण्याचे अधिकार प्रत्यायोजित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन स्थायी आदेश क्रमांक - एसआयए-२०२३/प्र.क्र.१०५/अ-२**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
विस्तारीत इमारत ४ था मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १७.११.२०२५.

**स्थायी आदेश:-**

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १६६ अन्वये तयार करण्यात आलेल्या, महाराष्ट्र शासन कार्य नियमावलीतील नियम १५ खाली महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी राज्याचे कामकाज अधिक सोयीस्कर रितीने चालण्यासाठी दिलेल्या अनुदेशातील भाग-दोन, सर्वसाधारण मधील अनुदेश क्र. ४ अन्वये असे निर्देशित केले आहे की, भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ या अधिनियमाखालील राज्य शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम (महाराष्ट्र सुधारणा), २०१८ अन्वये महाराष्ट्र राज्यासाठी केलेल्या तरतुदी अन्वये राज्यात विविध प्रकल्पांकरीता खाजगी जमिनी संपादित करण्यात येतात अशा प्रकरणांचा त्वरेने निपटारा होणे आवश्यक आहे.

यास्तव, उक्त नमूद अधिनियमाच्या कलम १० क अन्वये " प्रकरण दोन (सामाजिक आघात निर्धारण) व तीन (अन्न सुरक्षा विषयक तरतूदी) " या पासून सूट देण्याकरीता मान्यता देण्याचे अपर मुख्य सचिव (भूसंपादन, वने) यांना प्रदान करण्यात आलेले अधिकार आता विभागीय आयुक्त (सर्व) यांना शासन मान्यतेअंती या आदेशाव्दारे प्रत्यायोजित करण्यात येत आहेत.

सर्व विभागीय आयुक्त यांनी भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ या अधिनियमाखालील भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम (महाराष्ट्र सुधारणा), २०१८ या तरतुदी तसेच प्रकरणाची गुणवत्ता, सुट देण्याची कारणमिमांसा, सुट देण्याच्या पार्श्वभूमीवर भुधारकांना भुसंपादन / पुनर्वसनाबाबत अनुज्ञेय लाभ वा अनुषंगीक बाबींवर प्रतिकुल परिणाम होणार नाही, याबाबतची जिल्हाधिकारी यांचेमार्फत खातरजमा करावी. तसेच अशा प्रकरणी विभागीय आयुक्त कार्यालयातील विधी अधिकाऱ्यांच्या सल्ल्याने कायदेशीर बाबी तसेच निर्गमित

करावयाच्या अधिसुचनेचे प्रारूप अंतिम करून त्याबाबतची अधिसुचना शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात यावी.

०२. सदरचे स्थायी आदेश हे तात्काळ अंमलात येतील.

०३. सदर स्थायी आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२५१११७१६३०३१९८१९ असा आहे. सदर स्थायी आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHEETAL HARISH BHINGARDIVE

Digitally signed by SHEETAL HARISH BHINGARDIVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=811b70a9102967f853cc2b6ab33320a888d0446944cd32c5cbfea46ce603f707
, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=ABE1BF07925DA1BBAAACCA3C449FDCB0DFCA751E843E7D822224CF
DBFE0D8669, cn=SHEETAL HARISH BHINGARDIVE
Date: 2025.11.17 16:31:23 +05'30'

**(शितल भिंगारदिवे)**
**सहायक संचालक नगररचना**
**तथा अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत -**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अ.मु.स., मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री (गृह व जलसंपदा) यांचे सचिव उप मुख्यमंत्री कार्यालय, मुंबई.
४) मा.उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, उप मुख्यमंत्री कार्यालय, मुंबई.
५) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८) मा. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) मा. अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) मा. प्रधान सचिव (वने, भूसंपादन) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) सर्व मा.अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१२) मा. सह सचिव (भूसंपादन) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) सर्व विभागीय आयुक्त.
१४) सर्व जिल्हाधिकारी.
१५) मा. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सिडकोभवन, सि.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.
१६) मा. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई.
१७) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळ, मुंबई.
१८) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई.
१९) प्रादेशिक अधिकारी, मुंबई, महाराष्ट्र, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, प्रादेशिक कार्यालय,नवी मुंबई.
२०) प्रादेशिक अधिकारी, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, नागपूर प्रादेशिक कार्यालय, नागपूर- ४४००३३.
२१) संचालक, नगर रचना, पुणे.
२२) मुख्य अभियंता, मध्य व पश्चिम रेल्वे, मुंबई.

२३) मुख्य अभियंता, मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लि., मुंबई.
२४) महाराष्ट्र विमानतळ विकास कॉपोरेशन लि., मुंबई.
२५) सर्व भूसंपादन अधिकारी/उप विभागीय अधिकारी.
२६) सर्व उपायुक्त भूसंपादन (कोकण,पुणे,नाशिक,छत्रपती संभाजीनगर,नागपूर,अमरावती).
२७) महाव्यवस्थापक (भूमि व सर्वेक्षण), महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या., मुंबई.
२८) सर्व अधिक्षक अभियंता, (सार्वजनिक बांधकाम / जलसंपदा).
२९) निवडनस्ती- (अ-२).